पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ १८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/४/कावि/ ७०९ /२०१२
दिनांक- ०८/ ०५ /२०१२

प्रति,
मा.......................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा. महापालिका सभा दिनांक १९ / ०५ / २०१२ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत...

माननिय महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मे- २०१२ ची मासिक मा.महापालिका सभा शनिवार दिनांक १९ / ०५ / २०१२ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत :- १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

\\१७२.१६.०.६७\e drive\Nagersachiv१\GB १२-१३\agenda_४- May- १२.doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८
सूचना
[ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची प्रकरण २ मधील नियम क्रमांक १ (ए)(एच)(आय) अन्वये. ]

कार्यपत्रिका क्रमांक- ४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मे- २०१२ ची मासिक मा.महापालिका सभा शनिवार दिनांक १९.०५.२०१२ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

मा.महापालिका सभा क्र. ३ दि.२०/४/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.
----------

प्रश्नोत्तरे

[ मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ४४ अन्वये ]
-----------

मा. स्थायी समितीचे ठराव

विषय क्रमांक १) संदर्भ:- १) मा.विनया तापकीर, मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.२९२ दि.१७/४/२०१२

स्वाधार या सामाजिक संस्थेचे काम विचारात घेता कुंदननगर, फुगेवाडी शाळा येथिल २ खोल्या व पिंपळे गुरव परिसरातील भैरवनाथ मंदिराजवळील तळमजल्यावरील २ खोल्या मा.उपसंचालक नगररचना ठरवतील त्या भाडेदराने ५ वर्षे कालावधीकरीता भाड्याने देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक २) संदर्भ:-१) मा.चंद्रकांत वाळके, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.३९८ दि. २४/४/२०१२

संत तुकाराम भाजी मंडई येथील गाळा क्र. १७ अफरोजबानू सलीम खान यांस मा.उपसंचालक नगररचना ठरवतील त्या लीज दराने व योग्य त्या अटी शर्तीवर २५ वर्षे कालावधीसाठी लीजने देण्यास व त्याकामी करारनामा करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ३) संदर्भ - १) संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.सावा/२/कावि/१०४/२०१२दि.२५/४/१२
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.४४० दि. २/५/२०१२

वाचक व अभ्यासकांची मागणी पाहता पिंपरी-चिंचवड मनपाच्या लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवन, यमुनानगर येथील स्पर्धा परीक्षा केंद्र व वाचनालयातील कामकाज तात्पुरत्या उपविधीतील नियमांच्या आधारे सुरू करावयाचे असल्याने त्यास व तसेच स्पर्धा परिक्षा केंद्र व वाचनालयामध्ये सभासदत्व देणेकरिता प्रवेश फी र.रू.५०/- [र.रू.पन्नास] अनामत र.रू.१,०००/- [र.रू.एक हजार] व मासिक वर्गणी र.रू.१००/- [र.रू.शंभर] असे शुल्क निश्चित करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

------

## मा.विधी समितीचे ठराव

विषय क्रमांक ४) संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.प्रशा/१/कावि/१०४२/२०११ दि.२१/१२/२०११
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.४ दि.७/५/२०१२

महाराष्ट्र नागरी सेवेमधील तरतूदीचा विचार करता डॉ.श्री. रोकडे पी.डी. यांची मनपामध्ये दिनांक १२/११/२०११ रोजी ४ वर्षाची प्रतिनियुक्तीवरील सेवा पूर्ण होत असल्याने डॉ.रोकडे यांचे शासन सेवेमध्ये प्रत्यावर्तन करणे आवश्यक आहे तथापि शासनाकडून पर्यायी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत डॉ.रोकडे यांना मनपा सेवेमधून कार्यमुक्त न करता शासन मनपासाठी पर्यायी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करुन देईल त्या कालावधीपर्यंत डॉ.रोकडे यांना मान्यता व उर्वरित वैद्यकीय अधिकारी डॉ.सोनवणे व डॉ.मदने यांना दिनांक २५/०८/२०११ पासून पुढे १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ५) संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.प्रशा/१/कावि/१६८/२०१२ दि.०३/०३/२०१२
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.५ दि.७/५/२०१२

प्रस्तावा सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ प्रमाणे निवडणूक प्रभागांप्रमाणे सलगता विचारात घेवून अ, ब, क, ड प्रभागांमध्ये समाविष्ठ करावयाचे निवडणूक प्रभागाचे निश्चिती करण करणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ६)   संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.लेखा/६/कावि/१२९३/२०१२   दि.२६/०४/२०१२
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.९(ब) दि.७/५/२०१२

सन २०१२ - १३ चे  अंदाजपत्रकात नमुद केलेल्या र.रु.५० लाखावरील प्रस्तावा सोबतच्या यादीतील ( प्रपत्र - ब) कामांना प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ७)   संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.प्रशा/१/कावि/२८२/२०१२ दि.२७/०४/२०१२
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१० दि.७/५/२०१२

प्रस्तावात नमुद प्रमाणे सहाय्यक आयुक्त  अभिनामाचे पदाची अर्हता निश्चित करणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस  करणेत येत आहे.

------

मा.शहर सुधारणा समितीचे ठराव

विषय क्रमांक ८)    संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.
भूजी/सर्व्हे२/कावि/७५६/११, दि.१९/११/११
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.२४
दि.२९/१२/२०११
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.३०
दि.२०/०४/२०१२ अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नविन हद्दवाढीच्या भागश:  मंजूर विकास योजनेतील मौजे च-होली येथील स.नं.४०८ (जुना ४६४ पै) व ४०९ पै ( ४६५ पै) मधील भागश: मंजूर विकास योजनेतील आ.क्र.२/८३ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी योजना या आरक्षणाखालील महापालिकेच्या ताब्यात आलेले क्षेत्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, पुणे यांचेकडे राजीव आवास योजनेचा पायलट प्रोजेक्ट राबविण्याकामी र.रु.३,२००/- प्रती चौ.मी. दराने हस्तांतरीत करण्यास मान्यता देणेत यावी अशी मागणी मा.आयुक्त यांजकडून करणेत आली असली तरी महापालिकेच्या ताब्यात असलेल्या उपरोक्त क्षेत्राचे मनपाचे इडब्लूएस प्रोजेक्टसाठी प्रयोजन करणेस व कुठल्याही परिस्थिती मध्ये म्हाडा पुणे यांस न देणेस व जोपर्यंत या विषयावर निर्णय मा.सभेमध्ये होत नाही तोपर्यंत कुठलीही कार्यवाही ठ.क्र.१२४६ दि.१४/१२/२०११ प्रमाणे न करणेस मान्यता देणेत यावी अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

(टिप- माहे मे २०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक ९) संदर्भ :- १) मा. संतोष लोंढे मा. हनुमंतराव भोसले यांचा प्रस्ताव -
२) मा. क प्रभाग समिती सभा दि.०५/१०/२०११ ठ.क्र.६३
३) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.६
दि.२/५/२०१२

वॉर्ड क्र.२३गुळवेवस्ती, शांतीनगर या भागात सद्यस्थितीत असलेल्या नाल्याचे समांतर असलेला विकास आराखडयातील १२.०० मी. रुंदीचा रस्ता तसेच सदर रस्त्यापासून शांतीनगर झोपडपट्टीमधुन एम.आय.डी.सी. "एस" ब्लॉक ला मिळणारा १२.०० मी. रुंदीचा रस्ता असे दोन्ही ही रस्ते लोकवस्तीमधुन व झोपडपट्टीमधुन जात आहे. या भागात सद्यस्थितीत असलेले रस्ते लक्षात घेऊन तसेच लोकवस्ती व झोपडपट्टी लक्षात घेऊन सदर रस्ते विकसीत करण्याची आवश्यकता वाटत नाही. तरी सदर दोन्ही १२.०० मी. रुंदीचे रस्ते विकास आराखडयामधून रद्द करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक १०) संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त यांचे
क्र.नरवि/कावि/क४/२२७/२०११, दि. २८/१२/२०११
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.८
दि.२/५/२०१२

१) २.० हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्राच्या रेखांकनात ५ टक्के सुविधा क्षेत्र ठेवणे अनिवार्य करुन त्यामध्ये त्यापैकी १० टक्के क्षेत्र परवडण्याजोगी रोजगार सुविधासाठी (Affordable Work Space ) राखून ठेवण्याबाबत

२) मनपाच्या शॉपिंग सेंटर / मार्केट इत्यादींचा विकास / पुनर्विकास करताना त्यामधील १० टक्के क्षेत्र हे Affordable Work Space साठी राखून ठेवण्याबाबत.

वरील दोन तरतूदी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१क क) अन्वये शासनाने जाहिर केलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या हरकती / सुचना पाठविण्यात आल्या असून त्यावर पिं.चिं.मनपाच्या सर्वसाधारण सभेचे अभिप्राय मागविले असल्याने सदरचे हरकती / सुचना तपासून त्यावर अभिप्राय प्रस्तावा सोबतच्या प्रपत्रानुसार ठेवणेत आला असल्याने त्या प्रमाणे अभिप्राय पाठविणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ११)    संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त यांचे
क्र.नरवि/कावि/ ४क/२०२/२०१२, दि.०५/०३/२०१२
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.९
दि.२/५/२०१२

शासनाने सर्व महानगरपालिका क्षेत्रातील विद्यमान पेट्रोल पंप / डिझेल / सी.एन.जी. इ. पंप बंद करुन तेथे विद्यमान वापराव्यतिरिक्त इतर वापर करण्याबाबत निर्बंध घालण्याचा शासनाने म.प्रा.व न.र.अधि १९६६ च्या कलम ३७(१) सह १५४ अन्वये सर्व महानगरपालिकांना क्र.टिपीबी- ४६०८ /२११/ प्र.क्र.८७ /२००९/नवि-११ दि.०३/१२/२००९ नुसार निदेश दिलेले आहेत. सदर निर्णयाच्या अनुषंगाने मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१क क) अन्वये शासनाने नोटीस जाहीर केली आहे व त्यानुसार उपसंचालक नगररचना, पुणे विभाग पुणे यांना नियुक्त अधिकारी घोषित केलेले आहे. सदर नोटीसीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या हरकती / सुचना पाठविण्यात आल्या असून त्यावर पिं.चिं.मनपाच्या सर्वसाधारण सभेचे अभिप्राय मागविले असल्याने सदरचे हरकती / सुचना तपासून त्यावर अभिप्राय प्रस्तावा सोबतच्या प्रपत्रानुसार असल्याने त्या प्रमाणे अभिप्राय पाठविणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक १२)   संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.नरवि/कावि/ ड-
१ /२६५/२०१२, दि.३०/०४/२०१२
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.११
दि.२/५/२०१२

मौजे वाकड येथील पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील स.नं.२११ पैकी क्षेत्र जलाशय विभागाऐवजी निवासी विभागात समाविष्ट करणेकामी जाहिर नोटीशीचे अनुषंगाने ३० दिवसाचे विहित मुदतीत इकडील विभागास एकही हरकत प्राप्त झाली नाही. त्यामुळे सदरचे प्रस्तावास म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेकामी मान्यता व प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे,

-------

मा.शिक्षण मंडळाकडून आलेली पत्रे

विषय क्रमांक १३)    संदर्भ- १) मा.निर्वाचन अधिकारी व महापौर यांचेकडील
जा.क्र.महापौर/कावि/६६३/२०१२ दि.०२/०५/२०१२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या सदस्यत्वाकरिता दिनांक ३० एप्रिल, २०१२ रोजी झालेल्या निवडणूकीमध्ये १) अनुसूचित जातीचे आणि अनुसूचीत जमातीचे प्रतिनिधी या प्रवर्गासाठी-ओव्हाळ लता आनंद, २) मॅट्रिक्युलेट किंवा द्वितीय वर्ष प्रशिक्षण प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा तत्सम किंवा उच्चतर शैक्षणिक अर्हता धारण करणा-या व्यक्ती या प्रवर्गासाठी-लोखंडे विजय तुकाराम, घुले चेतन

गोवर्धन,भालेकर धनंजय पांडुरंग, ३) सर्वसाधारण जागा या प्रवर्गासाठी-जाधव शिरीष विश्रामराव, शिवले जगन्नाथ कोंडीबा, शेख फजल दस्तगीर, शिंदे निवृत्ती विठ्ठल, सौ.खुळे सविता बाळकृष्ण, आगरवाल शाम साधुराम हे निवडून आले असल्याची बाब मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ मधील नियम १८ प्रमाणे मा.महापालिका सभेपुढे अवलोकनार्थ ठेवावी.

------

मा.आयुक्तांकडून आलेली पत्रे

विषय क्रमांक १४) संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/ड-१/७०/२०१२ दि.१६/४/२०१२
२) मा.महापालिका सभा ठ.क्र.३८ दि.२०/०४/२०१२ अन्वये.

महानगरपालिका मंजूर सुधारीत विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस-१८९३/१२७६/सीआर/१७४/९३/युडी-१३ दि. १८ सप्टेंबर १९९५, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजना शासन निर्णय क्र.टिपीएस-१८९३/१४१२/युडी-१३ दि. २८ नोव्हेंबर १९९५ नुसार काही भाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका नियोजन नियंत्रण कक्षेत शासन निर्णय क्र. पीएसएन/१६९७/९३४/प्र.क्र.८९/नवि-२२ दि. १५ नोव्हेंबर १९९७ समाविष्ट करण्यात आलेले आहे तसेच या समाविष्ट क्षेत्रापैकी विकास योजना मंजूरीचेवेळी वगळलेल्या क्षेत्रासाठी शासन निर्णय क्र.टिपीएस-१८९३/१४१२/युडी-१३ दि. २८ डिसेंबर १९९९ नुसार मान्यता मिळालेली आहे. महापालिका क्षेत्रात वाढीव हद्दीच्या विकास योजनेस टिपीएस-१८०८/८९४/सीआर-१७२७/०९/नवि-१३ दि.१८ ऑगस्ट २००९ अन्वये मान्यता प्राप्त आहे.

विकास योजना आराखडयात दर्शविलेले आरक्षण व रस्त्यांपैकी काही ठिकाणी संबंधीत जमीन मालकांकडून, त्यांचे हितसंबंधीताकडून अथवा कुलमुखत्यार यांचे मौखीक अथवा लेखी संमतीने (बक्षिसपत्र व विनामोबदला करारनामा वगळून) विकास कामे व रस्त्याची कामे महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाकडून करण्यात आलेली आहेत. मात्र सदर जागेच्या ताब्यासंबंधी कोणताही दस्तऐवज करण्यात आलेला नाही. अशा प्रकारे महानगरपालिकेकडे भोसरी, पिंपरी, पिंपळेगुरव व सांगवी मधील एकूण १४ प्रकरणी जागामालकांनी रस्त्याचे आरक्षणाने बाधित जमीनीचा मोबदला स्वरुपात टीडीआर/एफएसआय मिळणेसाठी महानगरपालिकेकडे अर्ज/प्रस्ताव दाखल केले आहेत. विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. एन २.४.३ मधील तरतूद मध्ये (Development rights (DR's) are available only in case where development of a reservation has not been implemented) ज्या ठिकाणी आरक्षण विकसीत झालेले नाही त्या ठिकाणी देय राहिल, यामुळे मोबदला स्वरुपात टीडीआर/एफएसआय अदा केलेला नाही. वरील प्रमाणे महानगरपालिकेने या १४ प्रकरणां व्यतिरीक्त इतर अनेक ठिकाणीही जमीन मालकांकडून, त्यांचे हितसंबंधीताकडून अथवा कुलमुखत्यार यांचे मौखीक अथवा लेखी संमतीने (बक्षिसपत्र व विनामोबदला करारनामा वगळून) विकास कामे व रस्त्याची कामे विकसीत केलेली

आहेत. त्याबाबतही मोबदला देणेबाबत विकास नियंत्रण नियमावली मध्ये फेरबदलाचा प्रस्ताव मा.महापालिका सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आला.

मा.महापालिका ठराव क्र. ८४८ दि. २१/४/२०१० नुसार " टीडीआर बाबतचे दि. ३/२/२००७ चे शासननिदेश व त्यानुषंगाने नगर विकास विभागाकडील दि. १६/८/२००७ रोजीचे मार्गदर्शन याचा साकल्याने विचार करता पिंपरी चिंचवड महानगरपालिके बरोबर केलेल्या लेखी करार असल्यास करारचे तारखेपासून किंवा महापालिकेची सुधारीत मंजूर विकास योजना आराखडयाच्या मंजूरी दिनांकापासून म्हणजेच दि. १८ सप्टेंबर १९९५ पासून जमिन मालकांना कोणताही मोबदला न देता प्रत्यक्षात त्यांच्या ताब्यात आलेल्या जागेवर रस्ते व आरक्षणे इ. विकास कामे केलेली आहेत अशा सर्व संबंधितांना महानगरपालिकेच्या नावे नोंदणीकृत हस्तांतर दस्त लिहून दिल्यास नियमाप्रमाणे होणारा मोबदला एफएसआय/टीडीआर च्या स्वरुपात देणेकामी व त्या प्रमाणे प्रस्तावासोबत जोडलेल्या प्रपत्र अ व प्रपत्र ब प्रमाणे विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करणेकामी म.प्रा.व न.र.अधि.१९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे." मान्यता दिलेली आहे.

महानगरपालिकेने सदर मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. एन २.३ व एन २.४.३ मध्ये कलम ३७ अन्वये फेरबदल प्रसिध्द केलेला आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे. सदर फेरबदलामध्ये प्रामुख्याने

१) नियम क्र.एन २.३ मध्ये विकास योजनेमधील नविन रस्ता अथवा रस्तारुंदीसाठी एफएसआय देय राहील (for road widening or constructing new roads) असे नमुद असल्याने विकास योजनेमधील रस्ता अथवा रस्तारुंदीने बाधित जागा रितसर जागाताब्यात न घेता १८ सप्टेंबर १९९५ नंतर (सुधारीत विकास योजनेस मंजूरी ची तारीख) मनपाने रस्ता विकसीत केला आहे असा बाधित जागेचा मोबदला एफएसआय स्वरुपात देय राहील, व

२) नियम क्र एन २.४.३ मध्ये विकास योजने मधील आरक्षण, रस्ता अथवा रस्तारुंदी विकसीत झालेली नाही अशा जागांसाठी टीडीआर अनुज्ञेय राहील (Development Rights DRs is available only in case where development of a reservation has not been implemented) असे नमुद असल्याने विकास योजनेमधील रस्ता अथवा रस्तारुंदीने बाधित जागा रितसर जागा ताब्यात न घेता १८ सप्टेंबर १९९५ नंतर (सुधारीत विकास योजनेस मंजूरी ची तारीख) मनपाने रस्ता विकसीत केला आहे असा बाधीत जागेचा मोबदला टीडीआर स्वरुपात देय राहील.

असे प्रस्तावित आहे.

सदर फेरबदल महाराष्ट्र राजपत्र १ जुलै २०१० मध्ये व वृत्तपत्र दै.लोकमत व दै.पुढारी मध्ये दि. १ जुलै २०१० रोजी प्रसिध्दी देण्यात आली त्यावर प्राप्त हरकती व सुचनां वर सुनावणी झालेली आहे. सदर हरकती सुचनांचा अहवाल व त्यावर महापालिकेचा अभिप्राय तयार करण्यात आला आहे.

याबाबत प्रशासनाचे मत पुढील प्रमाणे आहे.

प्रारुप विकास योजना प्रसिध्द झाल्यानंतर सदर विकास योजना नकाशात जे रस्ते विकसीत झालेले (अस्तीत्वातील रस्ते) काळया रंगाने दर्शविलेले आहेत त्या

व्यतिरीक्त जे रस्ते आहेत ते प्रस्तावित रस्ते व रस्ता रुंदी लाल रंगाने दर्शविलेले आहेत.

वरील बाबींचा विचार विकास योजना आराखडयात दर्शविलेले आरक्षण व रस्त्यांपैकी काही ठिकाणी संबंधीत जमीन मालकांकडून, त्यांचे हितसंबधीताकडून अथवा कुलमुखत्यार यांचे मौखीक अथवा लेखी संमतीने (बक्षिसपत्र व विनामोबदला करारनामा वगळून) विकास कामे व रस्त्याची कामे महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाकडून करण्यात आलेली आहेत. मात्र सदर जागेच्या ताब्यासंबंधी कोणताही दस्तऐवज करण्यात आलेला नाही.

अशा प्रकरणी

अ) सदर रस्ता, रस्तारुंदी व आरक्षण दि. १६/१२/१९९९ नंतर म्हणजेच विकास नियंत्रण नियमावलीत टीडीआरची तरतूद समाविष्ट झाली त्यानंतर विकसीत झाले असल्यास अशा जमीनीचा मोबदला टीडीआर स्वरुपात अदा करता येईल.

महानगरपालिकेने सदर मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. एन २.३ व एन २.४.३ मध्ये कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्तावित केलेला आहे. त्यावर हरकती सुचनांबाबत सुनावणी झालेली आहे. सदर हरकती सुचनांचा अहवाल व त्यावर महापालिकेचा अभिप्रायानुसार आवश्यक दुरुस्त्या व वरील अ प्रमाणे विकास नियंत्रण नियमावली मध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्यास मा.महापालिका सभेची मान्यता घेऊन शासन मान्यतेसाठी सादर करावयाचा आहे. सदरचा विषय मा.महापालिका सभेपुढे मान्यतेस ठेवण्यात यावा.
(टिप- माहे मे २०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक १५) संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील
जा.क्र.आ.कक्ष/५६/२०१२ दि.२६/०४/२०१२
२) आमचे पत्र दिनांक ३०/०३/२०१२ व ०२/०४/२०१२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांच्या नियुक्तीबाबतचे संदर्भ क्र.१ प्राप्त झाले आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर संदर्भ क्र. १ मधील नियम क्र. ५ नुसार ५ नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी संदर्भ क्र. २ नुसार मा. पक्षनेते / मा. गटनेते यांना पत्रे पाठवून सोमवार दिनांक ०२/०४/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता व त्यानंतर दिनांक १३/०४/२०१२ रोजी दुपारी २.०० वाजता आमच्याकडे विचार विनिमय करण्याकरिता बोलाविण्यात आले होते.

सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये पक्षाचे वा गटाचे तौलनिक संख्याबळ खालील प्रमाणे आहे.-

| अ.क्र. | विभागीय आयुक्त यांच्याकडे नोंद झालेले पक्ष/गट/आघाडी | सदस्य संख्या | नियुक्त करावयाची सदस्य संख्या |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी | ८४ | ३ |
| २ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी | २२ | १ |
| ३ | शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) | १५ | १ |
| ४ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ४ | ---- |
| ५ | भारतीय जनता पक्ष | ३ | ---- |
| | एकूण सदस्य संख्या | १२८ | ५ |

१) शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) तर्फे त्यांचे गटनेते मा. आप्पा ऊर्फ श्रीरंग चंदु बारणे यांनी दिनांक १३ / ०४ / २०१२ रोजी धुमाळ बाबासाहेब निवृत्ती यांचे नाव नामनिर्देशित पालिका सदस्य म्हणून सुचविलेले आहे / तसे नामनिर्देशन पत्र आवश्यक त्या पुराव्यासह माझ्या स्वाधीन केले आहे. दिनांक ०२/०४/२०१२ रोजी तसेच दिनांक १३/०४/२०१२ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी तर्फे त्यांचे गटनेता व सभागृहनेता मा. सौ. मंगलाताई अशोक कदम यांनी तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष ) आघाडी तर्फे त्यांचे गटनेता व विरोधी पक्षनेता मा. कैलास महादेव कदम यांनी कोणचेही नाव सुचविलेले नाही / कोणाचेही नामनिर्देशनपत्र माझ्या स्वाधीन केलेले नाही.

२) मा. पक्षनेत्यांशी / मा. गटनेत्यांशी विचारविनिमय करून खालील उमेदवाराची सर्व कागदपत्रे तपासली असल्याने व त्यांच्याकडे मुं.प्रां.मनपा अधिनियमानुसार लागणारी पात्रता असल्याने त्यांच्या नावाची शिफारस करणेत येत आहे.

| **अ.क्र.** | **विभागीय आयुक्त यांच्याकडे नोंद झालेले पक्ष/गट/आघाडी** | **उमेदवाराचे नांव** | **अर्हता** |
|---|---|---|---|
| १. | शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) | धुमाळ बाबासाहेब निवृत्ती | महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत असणा-या आणि समाजकल्याण कार्यामध्ये गुंतलेल्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम १९५० खाली नोंदणीकृत समाजाधिष्ठित अशासकीय संघटनेचा पदाधिकारी म्हणून पाच वर्षाचा अनुभव. |

वरील उमेदवाराने पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ९ अन्वये जी अर्हता लागते तीच अर्हता व महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ मधे नियम क्र. ४ मधे नमूद केलेली अर्हता त्याचेजवळ असल्याचे व मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम १० मधील अनार्हता नसल्याचे हमीपत्र / घोषणापत्र / शपथपत्र सादर केलेले आहे. सदर प्राप्त अर्जाची आवश्यक ती छाननी करून वरील व्यक्तीची नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्ती करावी अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

-------

मा.विशेष समित्यांचे वृत्तांत

मा.विधी समिती

विषय क्रमांक १६) अ) दि. ६/१/२०१२ व २/३/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.

ब) दि. १६/४/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.

-------

## मा.महिला व बालकल्याण समिती

विषय क्रमांक १७) अ) दि.११/१/२०१२, २२/२/२०१२ व ७/३/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दि.१६/४/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

## मा.शहर सुधारणा समिती

विषय क्रमांक १८) अ) दि.९/११/२०११, २३/११/२०११, ५/१२/२०११, १४/१२/२०११, २८/१२/२०११, २९/१२/२०११, २/१/२०१२, ४/१/२०१२, २२/२/२०१२ व ७/३/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दि.११/१/२०१२, २२/२/२०१२ व ७/३/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.
क) दि. १६/४/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

## मा.क्रिडा समिती

विषय क्रमांक १९) अ) दि.७/१२/२०११, २१/१२/२०११, ४/१/२०१२, २२/२/२०१२ व ७/३/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दि.४/१/२०१२,२२/२/२०१२ व ७/३/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.
क) दि.१६/४/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.

-------

**नगरसचिव**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८
क्रमांक :- नस / ४ / कावि /७०९ / २०१२
दिनांक :- ०८ / ०५ / २०१२
टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे [ डॉकेटस ] नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.